# नाशिक महानगरपालिका,नाशिक

राजीव गांधी भवन, मुख्यालय,शरणपुर रोड,नाशिक - ४२२ ००२
दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५७५६३१/३२/२५७९११९ फॅक्स नंबर. ०२५३-२५७७९३६

## पाहिजेत

नाशिक महानगरपालिका आस्थापना परिशिष्टावरील सहाय्यक क्रिडा अधिकारी या संवर्गातील रिक्त पदाकरिता पात्र उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात दिनांक / /२०० पावेतो अर्ज मागवित आहे.

| अ.क्र | पदनाम व वेतनश्रेणी | पद संख्या | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १) | सहाय्यक क्रिडा अधिकारी<br>वे.श्रे.५५००-१७५-९०००/-<br>(सुधारित वेतन संरचनेनुसार ९३००-३४१०० + ग्रेड वेतन ४३००/-)<br>एकत्रित वेतन द.म. (प्रथम तीन वर्षाकरिता)<br>प्रथम वर्ष -: र.रु ४५००/-<br>दुसरे वर्ष -: र.रु ५०००/-<br>तिसरे वर्ष -: र.रु ५५००/- | ०१ | खुला |

**शैक्षणिक अर्हता व अनुभव**

१. मान्यता प्राप्त विद्यापिठाचा कला/वाणिज्य/विज्ञान शाखेचा पदविधर
२. मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील एम.पी.एड पदवी
३. एल.एस.जी.डी.परिक्षा उत्तीर्ण
४. मान्यताप्राप्त संस्थेकडील इंग्रजी किंवा मराठी टंकलेखन कोर्स उत्तीर्ण
५. एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण

**उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना**

१. अर्ज करण्यापुर्वी उमेदवारांनी ते जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अटी पुर्ण करतात याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी नंतरच अर्ज करावेत.
२. जाहिरातीमध्ये दर्शविलेली अर्हता अर्ज करतेवेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.
३. उमेदवार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा अधिवास असलेला असावा व त्यास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
४. उमेदवारांनी नाव नोंदणी केलेल्या सेवायोजन कार्यालयाचे नाव,ठिकाण व नोंदणी क्रमांक अर्जामध्ये स्पष्ट नमुद करावा
५. परीक्षा/मुलाखत पत्र यापैकी किंवा इतर कार्यालयीन पत्रव्यवहार कोणत्याही टप्प्यावर पोस्ट ऑफिस खात्याकडून उमेदवारांस वेळेवर पत्र न मिळाल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.
६. या जाहिरातीपुर्वी केलेले अर्जाचा विचार केला जाणार नाही. त्याकरिता उमेदवारांनी नव्याने अर्ज करणे आवश्यक राहील.

**वयोमर्यादा** -:

१. उमेदवारांचे वय सर्वसाधारण गटासाठी किमान १८ पेक्षा कमी व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवाराचे वय ३८ पेक्षा जास्त नसावे. (जाहिरात प्रसिध्द झालेल्या तारखेस) त्याचप्रमाणे उमेदवार महापालिका सेवेत असल्यास त्यास १० वर्षे वयाची अट शिथिल करणेत येईल. तसेच प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडु इत्यादींसाठी त्या-त्या शासन निर्णयाप्रमाणे वयाची मर्यादा शिथीलक्षम राहील. उमेदवारांची वयोमर्यादा जाहिरातीच्या तारखेस गणली जाईल.
२. समांतर आरक्षणाप्रमाणे सदर प्रवर्गातील उमेदवारांनी योग्य तो पुराव्यासह दाखला जोडुन द्यावा.

**अर्ज करण्याची पध्दती** -:

१. उमेदवारांने विहीत नमुन्यात अर्ज करावा व अर्जावर ओळखपत्राच्या आकाराचे स्वत:चे अलिकडील काळातील छायाचित्र चिटकविणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना ए-४ पेपर साईज मध्ये संगणीकृत/टंकलेखीत करुन देखील करता येईल..

२. उमेदवारांने लिफाफ्यावर पदाच्या नावाचा स्पष्ट उल्लेख करावा.

३. अर्जावर लिहीलेला पत्ता नंतर बदलला जाणार नाही.

४. अर्ज बंद लिफाफ्यातुन मा.आयुक्त,नाशिक महानगरपालिका,नाशिक,मुख्यालय,राजीव गांधी भवन, शरणपुर रोड,नाशिक ४२२ ००२. येथे पोहचतील अशा रितीने दि.   /   /२००९ सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा रितीने पाठवावे. दिलेल्या अंतिम तारखेच्या नंतर पोस्टाने प्राप्त होणारे तसेच समक्ष आणून जमा करणारे अर्ज स्विकारले जाणार नाही,यांची अर्जदाराने नोंद घ्यावी.

५. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता,वय,पुर्व अनुभव,जात व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या सांक्षाकित केलेल्या प्रती जोडाव्यात. सुवाच्य नसलेले,अपुर्ण किंवा चुकीची माहिती भरलेली व स्वाक्षरी नसलेले अर्ज तसेच अर्जासोबत शैक्षणिक अर्हता,अनुभव,वय,जात,इत्यादी प्रमाणपत्राच्या साक्षांकित केलेल्या प्रती जोडलेल्या नसल्यास असे अर्ज फेटाळण्यात येतील.

६. विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झालेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसुचित केलेले राजपत्र यांच्या प्रति जोडणे आवश्यक आहे.

७. विहित अर्हता व वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथील केले जाणार नाही. विहित अर्हता व वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांने अर्ज करु नये.

८. रजिष्ट्रर पोस्टाने आलेल्या पाकिटाची पोच पावती देणेंत येईल.मात्र साध्या पोस्टाने किंवा यु.पी.सी.ने आलेल्या अर्जाची पोच दिली जाणार नाही. तसेच कुरीअर सर्व्हीस अथवा अन्य मार्गाने आलेल्या अर्जास महापालिकेची पोच असेल तरच अशा अर्जाचा विचार केला जाईल. टपाल सेवेच्या दिरगांईस/विलंबास हे कार्यालय जबाबदार नाही यांची नोंद घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक काटेकोरपणे पाळला जाईल.

९. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर टपालाने/रजिष्टर पोष्टाने/स्पीड पोष्टाने/कुरियरने प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही प्रकारे विचारात घेतले जाणार नाही.

१०. महानगरपालिका सेवेत असलेले इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांनी शैक्षणिक पात्रता व अनुभव इत्यादी पात्रतेनुसार अर्ज करावेत.

११. शासकिय/निमशासकिय कर्मचा-यांना त्यांच्या विभाग प्रमुखांनी संमती दिली असेल,तरच त्याचे अर्ज ग्राहय समजले जातील व इतरांना त्यांच्या पदाचा सेवाशर्ती नियमानुसार कार्यालयप्रमुखांमार्फत अर्ज पाठविणे आवश्यक असेल तरच असे अर्ज कार्यालय प्रमुखांमार्फत पाठवावे.

**अतिरिक्त शैक्षणिक आर्हता** -:

१. सदर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र ६१/२००१/३९ दि.१९/०३/२००३ अन्वये संगणक हताळणी/वापराबाबतचे खालील नमुद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीपासुन दोन वर्षोच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहिल.

२. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूबांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शासनाने गट क व ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक आर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूबांचे प्रतिज्ञापण अर्ज सोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापण अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधीत उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल. अविवाहीत उमेदवारांनीसुध्दा प्रतिज्ञापत्रात अविवाहीत असल्याचे नमुद करुन प्रतिज्ञापत्र सोबत सादर करणे बंधणकारक आहे.

**पदांचा निवडीसाठी कार्यपध्दती व विशेष सुचना -:**

१. प्राप्त अर्जांनुसार पात्रताधारक अर्जाची संख्या विचारात घेवुन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रानिम-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ दि.१९/१०/२००७ नुसार गट क चे रिक्त पद भरतांना उमेदवाराची निवड लेखी परिक्षेद्वारे करण्यात येईल. याकरिता वस्तुनिष्ठ पध्दतीची लेखी परिक्षा ८० गुणांची व मुलाखती करीता २० गुणांची अशी एकुण १०० गुणांची परिक्षा राहिल.

२. निवड प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांचे बाबतीत कोणत्याही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

३. लेखी परिक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणानुक्रमानुसार निवड यादी करण्यात येईल.

४. विहित नमुन्यानुसार/निकषानुसार अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त सो यांचे कडेस राखुन ठेवला असुन, या सदर्भात उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही. पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे चुकीची माहिती दिल्यावर शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

५. तोंडी, लेखी परिक्षेच्या निकालानंतर उमेदवारांना त्यांची मुळ प्रमाणपत्र पडताळणीसाठी जेव्हा बोलविण्यात येईल, त्यावेळी मुळ प्रमाणपत्रांवरुन पात्र/अपात्र ठरविण्यात येईल.

६. सेवायोजन अधिकारी नाशिक, जिल्हा समाज कल्याण अधिकारी नाशिक व एकात्मिक आदिवाशी विकास विभाग यांचे कडून प्राप्त झालेल्या नांवाची यादी तसेच जाहिरातीव्दारे प्राप्त होणारे अर्ज इ.विचारात घेवून निवड प्रकिया करण्यात येईल.

**महत्वाच्या सुचना -:**

१. पात्रता,अर्जाची स्विकृती किंवा नाकारणे,चुकीची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा अंतिम निर्णय राहील याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

२. निवड प्रक्रियेत कुठल्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाब आणणारा उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

३. पद भरती प्रकिया अत्यंत तर्क शुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

४. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

५. उमेदवारांना लेखी परिक्षेला येण्या-जाण्याचा प्रवास खर्च व इतर खर्च दिला जाणार नाही.

६. नियुक्ती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना प्रथम तीन वर्षाकरिता उक्त नमुद केल्यानुसार एकत्रित वेतन दिले जाईल,अन्य भत्ते लागु राहणार नाही.

७. उमेदवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला,असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नाही, असे अढळल्यास, गैरवर्तन करतांना आढळल्यास,दबाव तत्रांचा वापर करतांना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवारांची नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

( भास्कर दि. सानप )
आयुक्त
नाशिक महानगरपालिका,नाशिक

# सहाय्यक क्रिडा अधिकारी पदासाठी अर्ज

प्रति,
मा.आयुक्त
नाशिक महानगरपालिका,नाशिक
राजीव गांधी भवन, मुख्यालय,शरणपुर रोड,
नाशिक - ४२२ ००२

मी .................................... या पदासाठी अर्ज करीत असुन माझा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. संपुर्ण नांव -: आडनांव स्वतःचे नांव वडिलांचे/पतीचे नांव

............................ ............................ ............................

२. व्यवहाराचा पत्ता -: ..................................................................

..................................................................

..................................................................

-: दुरध्वनी क्र. ............................ मोबाईल क्र. ............................

३. स्त्री/पुरुष :-

४. राष्ट्रियत्व :-

५. जन्म तारिख :- / /१९

( अक्षरात- .................................................................. )

६. दि. / /२०० रोजी वय :- वर्षे...........महिने.............दिवस............

७. जात/पोटजात -: ................................................

८. शैक्षणिक अर्हता :- ..................................................................

..................................................................

..................................................................

मी शपथपुर्वक प्रमाणित करतो/करते कि, उपरोक्त माहिती खरी असुन, मुलाखतीच्या वेळीस पडताळणीसाठी मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधककारक असल्याची मला जाणीव आहे. तसेच भविष्यात माहितीत कोणतीही चूक आढळल्यास अथवा खोटी असल्याचे आढळून आल्यास मला कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविले जाण्याचे तसेच फौजदारी कार्यवाहीस मी पात्र राहिन याची मला जाणीव आहे.

स्थळ :-
दिनांक :- / /२०० अर्जदाराची सही.

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूबांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना

### प्रतिज्ञापत्र

मी श्री ........................................................ श्री. ........................................................

यांचा मुलगा/मुलगी वय ............ वर्षे राहणार ........................................................

........................................................ याव्दारे पुढील प्रमाणे जाहिर करतो कि,

१) मी ........................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) विवाहित असल्यास आज रोजी मला .................... संख्ये इतकी हयात अपत्य आहे. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या ................ आहे. (असल्यास जन्मदिनांक)

३) विवाहित असल्यास हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे मी या पदासाठी अपात्र, होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- उमेदवाराची स्वाक्षरी

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहिती प्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक आर्हता माझ्यापाशी आहे. याची खात्री करुनच हा अर्ज करीत आहे. मी आणखी असे प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस मी पात्र व बांधिल राहिल व याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.